Date :- 30/6/97.

Sir,

The Minutes have been prepared by Shri Gorde. We are now sending it to you before sending it to C.M.

Sonali
(P.A. to. CEO).

Pl. Carry out the corrections on page 15 and resubmitt.

Kshatriya
CEO
30/6

पृ. ९१ (?)
अधि. प्राधिकरण

[illegible]

[signature] ९।१।९६

I am keeping [illegible] below to indicate additional items of Agenda note. Please prepare within 3 days

[signature] 20.1.96.

[illegible] 5.2.97

AAO

दि. 3.3.90 [illegible]

[signature] 3/3

Agenda notes for the Authority's meeting are prepared and submitted. Sr. NO 1 to 13 for appr. Latest status of schemes as a part of item no. 2 would be attached later

[signature] 21.3.97

[illegible]

स्रोपुत्रा / प्रक्षालन

पृ. ३/६/६।

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

दिनांक :- २६.६.९७

प्राधिकरणाची चौथी बैठक दिनांक २० जून,१९९७ रोजी दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदरहू बैठकीचे कार्यवृत्त तयार करून पृष्ठ क्र. १२९ ते १५३/प. वि. वर सादर केली आहे. सदर कार्यवृत्त प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत पक्के होण्याची वाट न पहाता सर्व बाबींवर मा.अध्यक्षांच्या मान्यतेनंतर कार्यवाही सुरू करावी.

सदर कार्यवृत्त माननीय अध्यक्षांच्या मान्यतेसाठी सादर.

[signature] २६/६/९७.
सचिव

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी

मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

दिनांक :- २७.६.९७

प्राधिकरणाची चौथी बैठक दिनांक २० जून,१९९७ रोजी दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदरहू बैठकीचे कार्यवृत्त तयार करून सादर केले आहे. सदर कार्यवृत्त प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत पक्के होण्याची वाट न पहाता सर्व बाबींवर मा.अध्यक्षांचे मान्यतेनंतर कार्यवाही सुरू करण्याची परवानगी असावी.

सदर कार्यवृत्त माननीय अध्यक्षांच्या मान्यतेसाठी सादर.

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव यांना विनंती आहे की, त्यांनी प्रस्तुत बैठकीचे कार्यवृत्तास मा.अध्यक्षांची मान्यता घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत पाठवावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
३०/६/९७.

मा.मुख्यमंत्री व प्राधिकरणाचे अध्यक्ष
यांचे प्रधान सचिव

मुख्य मंत्र्यांचे कार्यालय
दिनांक ९/७/९७
क्रमांक ३५७६

मा. मुख्य सचिवांनी कृपया पहावे अशी विनंती आहे.

मु. मं. स. प्राप्त झाले
क्र. ७/८/७९७

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २० जून, १९९७ |
| वेळ | : | दुपारी १२.३० वाजता |
| स्थळ | : | मा.मुख्यमंत्र्याचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई. |

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी नव्याने नियुक्त झालेले म्हाडाचे अध्यक्ष, श्री.विलास अवचट, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियोजित मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.गौतम चटर्जी तसेच नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री.के.नलिनाक्षण यांचे प्राधिकरणाच्या बैठकीसाठी प्रथमत: स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. मा.अध्यक्षांच्या सुचनेवरुन श्री.क्षत्रिय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात आलेल्या विषय सूचीवरील मुद्यांची माहिती थोडक्यात विशद केली, ती खालीलप्रमाणे आहे :-

प्राधिकरणाची तिसरी बैठक दि.१३-९-९६ रोजी झाली होती. त्यानंतर प्राधिकरणांतर्गत योजनांच्या कामकाजाचा आढावा मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०-१-९७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. प्राधिकरणाच्या मागील बैठकीनंतर झालेल्या कामकाजाचा संक्षिप्त गोषवारा मु.का.अ. यांनी सादर केला. मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे शासनाने प्राधिकरणाला निगम निकायचा दर्जा प्रदान केल्याची माहिती मु.का.अ. यांनी दिली. महानगरपालिकेकडून कांही अधिकारी/ कर्मचारी प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीवर नेमण्यासाठी कार्यमुक्त करुन त्यांना रुजू करुन घेण्याची कार्यवाही पूर्ण झाल्याचे विदित केले. विकास नियंत्रण नियमावलीस अंतिम स्वरुप देण्याच्यादृष्टीने प्राधिकरणाने कार्यवाही सुरु केल्याची माहिती देऊन सदरहू प्रारुप नियमावलीच्या आधारे पुनर्वसन प्रकल्पांना मंजूरी देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्वसन प्रस्तावांना वेग यावा व त्यासाठी त्यांना आर्थिक कर्ज

उपलब्ध व्हावे म्हणून भूखंडाच्या भाडेपट्टा करारातील तरतूदी सुटसूटीत करण्याचा प्रस्तावही शासनाला अलिकडेच सादर केल्याचे सांगितले. विकास नियंत्रण नियमावलीस अंतिम स्वरुप देऊन ती मंजूरीसाठी दि. २१-३-९७ रोजी नगर विकास विभागास पाठविल्याची माहिती त्यांनी दिली.

वरील आढाव्यानंतर प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीपुढे माहितीसाठी अथवा निर्णयासाठी सादर करण्यात आलेल्या विविध बाबींची मु.का.अ. यांनी माहिती दिली. त्यात मुख्यत्वेकरुन प्राधिकरणाचे वित्तिय व्यवहार चालविण्यासाठी विहित केलेली प्रक्रिया, प्राधिकृत अधिकारी, प्राधिकरणाच्या सेवेत रुजू झालेले अधिकारी/कर्मचारी यांची माहिती, त्यांना देण्यात यावयाच्या प्रतिनियुक्ती भत्याचा प्रस्ताव, सदस्यांना देण्यात यावयाचे मानधन, अधिकारी/कर्मचाऱ्यांना द्यावयाची वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादी बाबींचा अंतर्भाव होता. योजनेला गती देण्याच्यादृष्टीने प्राधिकरणाने केलेल्या उपाययोजनेच्या संदर्भात तयार केलेले परिशिष्ट-२, योजनेतील सहभागाची व्याप्ती वाढविण्याचा प्रस्ताव, विकास खर्च आणि संस्था/विकासकांनी भरावयाच्या ठेवी, संक्रमण शिबीरांची उपलब्धता इत्यादी बाबी प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर केल्याचे मु.का.अ. यांनी सांगितले. यानंतर मा.अध्यक्षांनी विषयसूचीवरील मुद्देनिहाय चर्चा सुरु केली व त्यावर घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत :-

<u>बाब क्रमांक-४/१</u> : विषय : दि.१३-९-९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त

दि.१३-९-९६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूरीसाठी सादर करण्यात आले होते. त्यासंबंधी कोणास कांही सूचना अथवा बदल सूचवावयाचा आहे काय अशी मा.अध्यक्षांनी विचारणा केली. तथापि कोणाकडूनही सूचना अथवा बदल प्रस्तावित न झाल्याने तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यात आले.

<u>ठराव क्र.४/१/१</u> : प्राधिकरणाच्या दिनांक १३-९-९६ च्या तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

बाब क्र.४/१/अ : प्राधिकरणाची तिसरी बैठकीनंतर प्राधिकरणांतर्गत केलेले काम व योजनांचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांनी दि.३०-१-९७ रोजी एक आढावा बैठक आयोजित केली होती. या आढावा बैठकीचे सविस्तर कार्यवृत्त प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर करण्यात आले होते.

ह्या कार्यवृत्ताची प्राधिकरणाने नोंद घेतली. तथापि सर्व इतिवृत्त व पत्रव्यवहार शक्यतो मराठीतूनच करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

बाब क्र. ४/२ : विषय : प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीनंतर प्राधिकरणाने केलेल्या कामकाजाची माहिती

प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीनंतर प्राधिकरणाने केलेल्या कामकाजाची माहिती ह्या बाबीद्वारे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात आली. सुरुवातीपासून १६ जून, १९९७ पर्यंत प्राधिकरणाकडे एकूण ३१८ प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी २८७ प्रस्तावांना मंजूरी दिल्याची माहिती मु.का.अ. यांनी दिली. त्याचा अधिक खुलासा करतांना उपनगर अभियंता, श्री.देशपांडे यांनी सांगितले की, मंजूरी दिलेल्या प्रस्तावापैकी २५७ प्रस्तावांना आशयपत्र दिले आहे तर १४० प्रस्तावांना आयओडी दिली आहे. वरीलपैकी एकूण ६१ योजनांच्या प्रत्यक्ष काम चालू झाले आहे. त्यावर मा.अध्यक्षांनी अशी सूचना केली की, आशयपत्रे व मंजूरी दिलेल्या प्रस्तावांच्या संख्येत तफावत दिसून येते. शिवाय आराखडे मंजूर झाले तरच खऱ्या अर्थाने प्रस्ताव मंजूर केला असे ग्राह्य धरता येते अन्यथा नाही. त्यामुळे माहिती सादर करतांना यापुढे योग्य तो बदल करावा. मालमत्ता करात सवलत द्यावी असा प्रस्ताव महानगरपालिकेने न.वि.विभागाकडे सादर केल्याची माहिती देण्यात आली. त्यावर न.वि.विभागाने त्वरेने निर्णय घ्यावा असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले. प्रारुप वि.नि.नियमावलीस अंतिम स्वरुप देण्याच्यादृष्टीने प्राधिकरणाने २१-३-९७ रोजी सुधारीत प्रस्ताव पाठविल्याचे नमुद करुन प्रस्तावीत महत्वाच्या बाबींची माहितीही बैठकीत देण्यात आली. संक्रमण शिबीरांच्या बाबतीत या विषयाच्या बाब टिप्पणीवरील चर्चेचा तपशील दिला आहे.

बाब क्र.४/३ : विषय : गृहनिर्माण भवनातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेतील बचत खाते चालविण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करणे.

ह्या विषयावरील बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केली होती व त्यास प्राधिकरणाने मंजूरी देतांना खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

ठराव क्र.४/३/२ : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नांवे बँक ऑफ महाराष्ट्र, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ ह्या शाखेतील बचत खात्यामधून प्राधिकरणाच्या कार्यालयीन खर्चासाठी पैसे काढण्यासाठी श्री.एस.के.जोशी, उपसंचालक, नगररचना आणि श्री.एम.जी.खाबडे, सहाय्यक सचिव ह्या दोन अधिकाऱ्यांना संयुक्तरित्या दि. ३१-३-९७ पर्यंत प्राधिकृत करण्यात आले होते. त्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

दि. १.४.९७ पासून उपरोल्लेखित खाते चालविण्यासाठी प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक, श्री.व्ही.जे.बिजवे आणि लेखा अधिकारी, श्री.व्ही.जी.साळवी यांना संयुक्तरित्या प्राधिकृत केल्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देत आहे.

बाब क्र.४/४ विषय : प्राधिकरणाकडून प्रस्ताव मंजूर करतांना किंवा त्यानंतर प्राप्त होणाऱ्या ठेवी आणि शुल्काच्या रकमांबाबत

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव मंजूर करतांना किंवा त्यानंतर प्राप्त होणाऱ्या विविध ठेवी किंवा शुल्कापोटी जमा होणाऱ्या रकमा प्राधिकरणाच्या बचत खात्यावर बँकेत जमा करण्यासाठी ४ स्वतंत्र खाती उघडण्यात आल्याची माहिती प्राधिकरणाला देण्यात आली. प्राधिकरणाकडे प्राप्त होणारा निधी संबंधित खात्यात जमा करण्यासाठी कार्यकारी अभियंता, श्री.डी.बी.होळीकर आणि श्री.एम.एल.तांबे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. ह्या प्रस्तावावर प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला.

ठराव क्र.४/४/३ : प्राधिकरणाकडे विविध ठेवी, छाननी शुल्क, विकास शुल्क इत्यादीपोटी जमा होणारा निधी प्राधिकरणाच्या संबंधित खात्यात जमा करण्यासाठी प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता श्री.डी.बी.होळीकर आणि श्री.एम.एल.तांबे यांना प्राधिकृत करण्याच्या कार्यवाहीला कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात आली.

बाब क्र.४/५ विषय : अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत

दिनांक १३-९-९६ च्या प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीनंतर रुजू झालेले अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आले आहे.

या विषयाच्या बाब टिप्पणीत सादर करण्यात आलेल्या माहितीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र.४/६ विषय : प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या शासकीय, निमशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना द्यावयाचा प्रतिनियुक्ती भत्ता ..

प्राधिकरणाची दि.१६-१२-१९९५ रोजी स्थापना झाल्यानंतर पुनर्वसन प्रस्तावांची छाननी, मंजूरी इत्यादी कामे करण्यासाठी अनुभवी अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता होती. त्यासाठी महानगरपालिका व इतर शासकीय विभागामधून आवश्यक तो अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीने घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. तथापि त्यास अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. ही बाब मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि.२५-५-९६ रोजी झालेल्या आढावा बैठकीत चर्चेस घेण्यात आली होती. आवश्यक व योग्य तो अधिकारी/कर्मचारी वर्ग प्रतिनियुक्तीवर मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहनात्मक भत्ता देणे आवश्यक असल्याचे मान्य करण्यात आले होते. करिता अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या २०% एवढा वाढीव (कमाल मर्यादा रु.१०००) दरमहा भत्ता देण्यात यावा असे ठरविले होते. त्या अनुषंगाने सदर बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली. त्यावर चर्चा करतांना मा.अध्यक्षांनी असे निदर्शनास आणले की, सद्या ह्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना २०% एवढा भत्ता देण्याची आवश्यकता दिसत नाही, त्याऐवजी मूळ वेतनाच्या १०% कमाल मर्यादा न ठेवता प्रतिनियुक्ती भत्ता देण्यात यावा असे ठरविण्यात आले.

ठराव क्र.४/६/४ : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १०% एवढा प्रतिनियुक्ती भत्ता देण्यात यावा.

हा निर्णय महानगरपालिका, शासकीय विभाग व इतर उपक्रमातून प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीने आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू होईल.

बाब क्र.४.७ विषय : प्राधिकरणाच्या सेवेत प्रतिनियुक्तीने रुजू झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती

प्राधिकरणाकडे शासन व इतर निमशासकीय संस्थातून/उपक्रमातून विविध अधिकारी व कर्मचारी प्रतिनियुक्तीने रुजू झालेले आहेत. त्यांना वैद्यकीय सेवा-सुविधा व खर्चाची प्रतिपूर्ती नियमित करण्यासाठी सध्या प्राधिकरणाने कोणतेही विवक्षित नियम तयार केलेले नाहीत. प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी हे संपूर्णत: शासकीय कर्मचारी नसल्याने वैद्यकीय सुविधा देण्यासाठी व खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी एक वैद्यकीय सल्लागार (मेडिकल रिटेनर) नियुक्त करावा असा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यावर चर्चा करतांना मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ज्या पध्दतीने त्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सेवा-सुविधा व खर्चाची प्रतिपूर्ती देते तिच पध्दती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी अंमलात आणावी.

ठराव क्र.४.७.५ : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करणे व त्यापोटी आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी स्वतंत्र वैद्यकीय सल्लागार (मेडिकल रिटेनर) नियुक्त करण्याची आवश्यकता नाही. प्राधिकरणाने याबाबतीत मुंबई गृहनिर्माण मंडळ व प्राधिकरणात अवलंबिण्यात येणाऱ्या पध्दतीचा अवलंब करावा.

बाब क्र.४/८ विषय : प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांना प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी मंजूर करावयाचे मानधन

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर शासनाने शासकीय सदस्यांव्यतिरिक्त अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली आहे. ह्या सदस्यांना प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी सद्या कोणताही भत्ता अथवा खर्च देण्यात येत नाही. यासंबंधी राज्य शासनाच्या वित्त विभागाने दि.१८-१०-९१ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अशासकीय सदस्यांना भत्ता व प्रवास खर्च देण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला.

ठराव क्र.४.८.६ : प्राधिकरणाचे अशासकीय सदस्यांना व निमंत्रितांना वित्त विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रत्येक बैठकीस उपस्थित राहण्याकरिता रु.१५०/- एवढा बैठक भत्ता देण्यास मंजूरी प्रदान केली. त्याचप्रमाणे बैठकीस उपस्थित राहण्याकरिता प्राधिकरण/शासनाने वाहन उपलब्ध न करुन दिल्यास रु.२५०/-एवढा प्रवास खर्च देण्यास मंजूरी दिली.

बाब क्र.४.९ विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रस्तावासोबत दाखल करावयाचे परिशिष्ट-२ बाबत

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावासोबत लाभार्थींची पात्रता, झोपड्यांची संख्या, भूखंडाचे क्षेत्रफळ इत्यादी तपशील अंतर्भूत असतो. मंजूरी प्रदान करतांना अनुज्ञेय असलेला चटईक्षेत्र निर्देशांक हा मुख्यत्वेकरुन भूखंडाचे क्षेत्रफळ व लाभार्थींची संख्या यावर अवलंबून असल्याने ही माहिती अचूक असणे आवश्यक असते. आतापर्यंत विविध यंत्रणांकडून ही माहिती विविध नमुन्यात प्राप्त होत असल्याने त्यात एकवाक्यता नव्हती. परिणामी योजना मंजूर करतांना माहितीचे योग्य संकलन व समन्वय साधण्यात अडचणी येत होत्या. त्यासाठी प्राधिकरणाने महानगरपालिका, म्हाडा व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमणे) या तिन यंत्रणांसाठी एक समान नमुना (परिशिष्ट-२) तयार केला. सदर परिशिष्ट-२ चे भाग एक व भाग दोन बाब टिप्पणीसोबत माहितीसाठी सादर करण्यात आले आहे.

बाब टिप्पणीन्वये सादर करण्यात आलेल्या परिशिष्ट-२ चे अवलोकन करून त्याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र.४/१० विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सहभागाची व्याप्ती वाढविण्याबाबत

झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करून नियोजित अथवा नोंदणीकृत संस्था प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करु शकतात. ह्या संस्था स्वत: किंवा वास्तुविशारद/विकासकामार्फत प्राधिकरणाकडे योजना मंजूरीसाठी सादर करतात. प्राधिकरणाकडून योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध सवलती देऊनसुध्दा सहकारी संस्था अथवा विकासकांकडून योजनेला मिळणारा प्रतिसाद अगदीच कमी आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन योजनेच्या अंमलबजावणीस अधिक गती मिळण्याच्यादृष्टीने झोपडपट्टीवासियांच्या सहकारी संस्था आणि गरजू सर्वसाधारण नागरीकांचा या योजनेत समावेश करून घ्यावा असे प्राधिकरणास वाटते. त्यासाठी प्रथमत: शासकीय व निमशासकीय नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरीकांना झोपडपट्टयांनी व्याप्त भूखंड त्यांच्या गृहनिर्माणासाठी पुनर्वसन योजनेंतर्गत उपलब्ध करून द्यावेत अशी संकल्पना आहे. मात्र नोकरदार आणि सर्वसामान्य नागरीकांच्या संस्थांनी ह्या योजनेत विकासकाची भूमिका पार पाडण्याची गरज आहे. असे केल्यास प्राधिकरणाकडून अशा संस्थांना झोपडपट्टीवासियांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती उपलब्ध करून देण्यात येतील. प्राधिकरणाच्या ह्या विषयीच्या बाब टिप्पणीवर चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र.४.१०.७ : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची व्याप्ती वाढवून सर्वसामान्य नागरीक अथवा शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या संस्थांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतचे भूखंड गृहनिर्माणासाठी उपलब्ध करून द्यावेत. अशा सहकारी संस्थानी ह्या योजनेंतर्गत विकासकाची भूमिका पार पाडावी. प्राधिकरणाने संबंधितांचा सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच हडकोसारख्या वित्तीय संस्थेचासुध्दा ह्या बाबतीत सक्रिय सहभाग मिळविण्याचा प्रयत्न करावा.

बाब क्र.४.११ विषय : समुद्र किनाऱ्यापासून ५०० मीटर अंतरावरील

झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाबाबत

मुंबई शहर तसेच उपनगरामधील अनेक झोपडपट्ट्या समुद्र किनाऱ्यालगत वसलेल्या आहेत. अशा झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करतांना केंद्र शासनाच्या सागरी क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. ह्या संदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे. तथापि अलिकडेच केंद्र शासनाने प्रस्तावित झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाबाबत कांही अधिक माहिती पाठविण्यास सांगितले आहे. प्राधिकरणाने अशी माहिती नगर विकास विभागास सादर केली आहे.

नगर विकास विभागाने याबाबतीत केंद्र शासनाकडे त्वरेने पाठपुरावा करावा असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले.

बाब क्र.४/१२ विषय : योजनेंतर्गत भरावयाच्या ठेवी व विकास खर्च यावर सवलती देण्याबाबत...

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सहकारी संस्था/विकासक यांना सद्याच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार प्रत्येक पुनर्वसन सदनिकेमागे रु.२०,००० बिनव्याजी ठेव ही कमाल ४ हप्त्यात व शेवटचा हप्ता पुनर्वसन घटकास भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी भरावयाची आहे. तसेच भूखंडावरील संपूर्ण बांधकामासाठी रु.८४० प्रती चौ.मी. विकास खर्चापोटी भरावयाची असून त्यातील पहिला हप्ता रु.२८० प्र.चौ.मी. पुनर्वसन योजना मंजूर होताना भरावयाचा आहे. अशाप्रकारे प्रस्ताव मंजूर होतांना/प्रत्यक्ष बांधकामाची परवानगी देतांना संस्था/विकासकास बरीच मोठी रक्कम एकरकमी प्राधिकरणाकडे भरावी लागते परंतु तोपर्यंत विकासकास विक्रीच्या सदनिकामधून कोणताही निधी मिळत नाही. ह्या योजनेंतर्गत प्रस्ताव दाखल न होण्यामागे, आर्थिक मंदी व्यतिरिक्त हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. त्यामुळे ही रक्कम भरण्यासाठी कांही निश्चित सवलत देण्यात यावी असे दि.३०-१-९७ च्या आढावा बैठकीमध्ये ठरविण्यात आले होते. ह्या अनुषंगाने सादर केलेल्या बाब टिप्पणीवर चर्चा करुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र.४.१२.८ : (अ) पुनर्वसन योजना मंजूर करतांना रु.२०,००० प्रती सदनिका याप्रमाणे भरावयाच्या रकमेपैकी एकही हप्ता भरण्याची आवश्यकता नाही.

(ब) पुनर्वसन अथवा विक्रीसाठी बांधावयाच्या सदनिकांचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी विकास खर्चाची कोणतीही रक्कम भरण्याची आवश्यकता नाही.

(क) विक्रीसाठीच्या सदनिकांचे बांधकाम जोत्यापर्यंत आल्यावर, त्यापुढील बांधकामाची परवानगी (सी.सी.) देण्यापूर्वी पुनर्वसन घटकासाठी देय असलेल्या रु.२०,००० ह्या रकमेपैकी रु.१०,००० चा एक हप्ता प्रती सदनिका, तसेच विकास खर्चापोटी भरावयाच्या रु.८४० प्रती चौ.मी. पैकी रु.२८० प्रती चौ.मी. चा पहिला हप्ता प्राधिकरणाकडे भरावा.

(ड) पुनर्वसन घटकाच्या बांधकामासाठी देय असलेल्या उर्वरित रकमेचे (रु.१०,००० प्रती सदनिका) उर्वरित हप्ते मुख्य कार्यकारी अधिकारी निश्चित करतील त्याप्रमाणे परंतु त्या घटकाच्या बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी भरावेत.

(इ) विकास खर्चापोटी भरावयाच्या उर्वरित रु.५६० प्रती चौ.मी. च्या रकमेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निश्चित करतील त्यानुसार परंतु विक्रीसाठीच्या सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी हप्ते भरावेत.

(फ) वर नमुद केल्याप्रमाणे संस्था व, वा विकासकांनी योग्य वेळी रकमेचा भरणा न केल्यास वा होईपर्यंत १६% दराने व्याज आकारणी करावी.

बाब क्र.४.१३ विषय : योजनेसाठी संक्रमण गाळे उपलब्ध करण्याबाबत

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्राप्त होत आहेत परंतु त्यांचे प्रमाण पुरेसे नाही. याबाबतीत आर्थिक मंदी व्यतिरिक्त संक्रमण शिबीरांचे गाळे उपलब्ध नसणे हे एक प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे. योजना राबविण्यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने आतापर्यंत सुमारे १५०० संक्रमण गाळे उपलब्ध करून दिले असले तरी ते सद्य पुरेसे नाहीत. त्याचप्रमाणे राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडे विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या संक्रमण गाळे या योजनेसाठी वापरले जाणे आवश्यक आहे. बैठकीत संक्रमण शिबीराच्या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना, विविध यंत्रणानी (म्हाडा, महापालिका व महसूल विभाग) सक्रिय

सहभाग घेणे आवश्यक असल्याने आहे असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. यापूर्वी बैठकीमध्ये संक्रमण गाळे उपलब्ध करुन देण्याविषयी आग्रहाने सांगूनसुध्दा फारशी प्रगती झाली नसल्याचे निदर्शनास आणून ह्या सर्व यंत्रणांनी आपापल्या जमीनीवर मोठया प्रमाणात संक्रमण गाळयांच्या योजना हाती घ्याव्यात व पुढील एक महिन्यात प्रत्येक यंत्रणेने किमान ३ ठिकाणी संक्रमण गाळे बांधण्याची कार्यवाही सुरु करावी असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले. शिवाय बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडून वेळोवेळी उपलब्ध होणारे संक्रमण गाळेसुध्दा या योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला.

बाब क्र.४/१४ विषय : विकासकाकडून प्रत्येक सदनिकेमागे मिळणाऱ्या रु.२०,००० च्या अनामत रकमेचा विनियोग

झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत विकासकांनी प्रत्येक पुनर्वसन सदनिका, वेलफेअर हॉल व बालवाडीसाठी रु.२०,००० एवढी अनामत रक्कम प्राधिकरणाकडे जमा करावयाची आहे. ह्या ठेवीमधून पुनर्वसन इमारतीची देखभाल, पाणीपुरवठा व परिरक्षण खर्चाचा कांही भाग वळता करणे शक्य व्हावे अशी कल्पना आहे. या ठेवीचा विनियोग कसा करावा यासंबंधी बैठकीत चर्चा करण्यात आली. सद्य:स्थितीत ह्या ठेवींची रक्कम सहकारी संस्थांना हस्तांतरीत करु नये असा प्राधिकरणाने ठराव केला.

ठराव क्र.४.१४.१ : योजनेंतर्गत प्राधिकरणाकडे ~~प्राधिकरणाकडे~~ प्राप्त होणारी ठेव (रु.२०,००० प्रती सदनिका) सद्या प्राधिकरणाकडे जमा करावी व झोपडपट्टीवासियांच्या सहकारी संस्थांना हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. त्याच्या विनियोगासंबंधी यथावकाश विचार करण्यात येईल.

बाब क्र.४/१५ विषय : योजनांतर्गत पात्र झोपडीधारकांना मोफत द्यावयाच्या सदनिकांवरील मुद्रांक शुल्क माफ करण्याबाबत

योजनांतर्गत कांही प्रकल्पांचे काम आता पूर्ण झाले आहे व लाभार्थींना सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत ह्या लाभार्थींना मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९५८ अन्वये मुद्रांक शुल्क देय ठरते. यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधीक्षक, मुद्रांक शुल्क यांच्याशी केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने झोपडपट्टीवासियांना मुद्रांक शुल्कातून कशी सूट

देता येईल ह्यासाठी प्रस्ताव तयार केला आहे, त्यावर चर्चा करण्यात आली. शासनाच्या महसुल विभागाने, ही बाब प्रथम प्राधिकरणाचे बैठकीत चर्चेला घ्यावी व त्यावरील शिफारशी शासनाला पाठवाव्यात असे सुचविले होते. त्यानुसार चर्चेअंती शासनाला शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

<u>ठराव क्र.४.१५.१०</u> : (अ) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना मोफत वाटप करावयाच्या सदनिकांवर मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमांतर्गत कोणतेही मुद्रांक शुल्क आकारु नये व अधिनियमाच्या तरतुदीतून त्यास सूट देण्यात यावी.

(ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सहकारी संस्था व विकासक यांच्यात होणाऱ्या विकासविषयक करारनाम्याच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क आकारतांना पुनर्वसनासाठी बांधलेले क्षेत्रफळ गृहित धरण्यात येऊ नये. खुल्या विक्रीसाठी बांधावयाच्या क्षेत्रफळाचे बाबतीत मुद्रांक शुल्क आकारतांना प्रकल्पाची बाजारभावाप्रमाणे किंमत गृहीत न धरता त्यावरील प्रकल्प खर्च गृहीत धरावा.

(क) खुल्या विक्रीसाठी बांधलेल्या सदनिकांचे विक्रीवर मुद्रांक शुल्क आकरतांना त्यांची प्रचलित नियमाप्रमाणे किंमत व देय मुद्रांक शुल्क आकारले जावे.

विषयसूचीवरील बाबींवर चर्चा झाल्यानंतर मा.अध्यक्षांच्या अनुमतीने खालील विषयांवर प्राधिकरणाने चर्चा केली. गृहनिर्माण क्षेत्रामध्ये असलेल्या आर्थिक मंदीव्यतिरिक्त पुनर्वसनाचे पुरेसे प्रस्ताव न येण्यामागे इतर अडचणी असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यात झोपडपट्टीवासियांच्या विविध गटातील मतभेद व भांडणे, कांही झोपडपट्टीवासियांच्या झोपडीचे मध्याचे क्षेत्र २२५ चौ.फुटापेक्षा अधिक असले तरी त्यांना योजनेनुसार २२५ पेक्षा जास्त क्षेत्र अनुज्ञेय नाही त्यामुळे ते योजनेत सहभागी होत नाहीत व प्रसंगी विरोध करतात, विकासक साधारणपणे मोक्याच्या व आकर्षक अशा ठिकाणच्या योजना प्रस्तावित करतात परंतु इतर ठिकाणचे प्रकल्प घेत नाहीत. त्यावर मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये किती झोपडपट्टीवासियांच्या सहकारी संस्थांनी विकासकाबरोबर करार केले आहेत व किती बाकी आहेत याचा संपूर्ण तपशील महापालिकेने सादर करावा. पूर्वीच्या बैठकीमध्ये

असा अहवाल देण्यास सांगितले असुनही अद्याप अहवाल न दिल्याबद्दल मा.अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. जुन्या व नव्या योजनातील तरतुदीबद्दल बोलतांना मा. मुख्य सचिवांनी सांगितले की काही भूखंडांच्या बाबतीत विकासकांना नव्या योजनेपेक्षा जुनी योजना आकर्षक वाटते. प्रधान सचिव (महसूल) यांनी सुचविले की भूखंडावरील झोपड्यांच्या घनतेच्या प्रमाणात बदल करून चटईक्षेत्र निर्देशांक दिला तर योजनेच्या दृष्टीने श्रेयस्कर होईल. त्यावर , विकास नियंत्रण नियमावलीस अंतिम रूप देताना नगर विकास विभागाने हया बाबी विचारात घ्याव्यात असे मा. अध्यक्षांनी सांगितले. मा.गृहनिर्माण मंत्र्यांनी सूचना केली की, झोपडपट्टीवासियांचा सहभाग वाढविण्यासाठी रा.गां.नि.प्रकल्पातील समाज विकास अधिकाऱ्यांचा संबंधितांनी उपयोग करून घ्यावा. टी वॉर्डमधील रेल्वे लगतच्या प्रकरणाचा श्री.सोमैय्या यांनी उल्लेख केला. त्यावर ह्या टीडीआर देण्याच्या प्रस्तावाचा नगर विकास विभागाने पाठपुरावा करावा अशी मा.अध्यक्षांनी सूचना केली. मंजूर झालेल्या व प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेल्या प्रकल्पांना कांही झोपडीधारक अडथळा आणित असल्याचा उल्लेख श्री.वायकर यांनी केला. याबाबतीत मा.अध्यक्षांनी आदेश दिले की, अशा प्रकरणी संबंधित जमीनमालक यंत्रणेने योग्य ती कारवाई करावी व योजनेला अडथळा होणार नाही असे पहावे. झोपडपट्टीवासियांना आकर्षित करण्यासाठी सध्याच्या २२५ चौ.फुट चटईक्षेत्रामध्ये बाल्कनीच्या रुपाने वाढीव चटईक्षेत्र देता येईल किंवा कसे या श्री.वायकर यांच्या सूचनेवर नगर विकास विभागाने विकास नियंत्रण नियमावलीस अंतिम स्वरुप देताना विचार करावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले. श्री.प्रभू यांनी अशी सूचना केली की, सद्याच्या तरतुदीनुसार विकासकांनी बांधून दिलेल्या संक्रमण शिबीरातील अर्धा भाग १० वर्षांनंतर परत केला जातो तर हा कालावधी कमी करावा. न.वि.विभागाने नियमावलीस अंतिम स्वरुप देतांना ह्याही सूचनेचा विचार करावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

दिनांक २० जून, १९९७ च्या चौथ्या बैठकीसाठी खालील सन्माननीय सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.मनोहर जोशी, मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २) | मा.श्री.चंद्रकांत खैरे, गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| ३) | मा.श्री.रविंद्र माने, राज्यमंत्री, नगर विकास | सदस्य |
| ४) | मा.श्री.दिनेश अफझुलपूरकर, मुख्य सचिव | सदस्य |
| ५) | श्री गिरिश गोखले, महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई | सदस्य |
| ६) | श्री.अजित वर्टी, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ७) | श्री के.नलिनाक्षण, प्रधान सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| ८) | श्री.एस.एस.क्षत्रिय, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्राधिकरण | सदस्य |
| ९) | श्री.जयंत कावळे, सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १०) | श्री.किरिट सोमैय्या, आमदार | सदस्य |
| ११) | श्रीमती शीला पटेल, | सदस्य |
| १२) | श्री.शशी प्रभू, वास्तुविशारद | सदस्य |
| १३) | श्री.दिपक सातवळेकर, व्यवस्थापकीय संचालक, एचडीएफसी | सदस्य |
| १४) | श्री.शिरीष पटेल, वास्तुविशारद | सदस्य |
| १५) | श्री विलास अवचट, अध्यक्ष, म्हाडा | विशेष निमंत्रित |
| १६) | श्री.रविंद्र वायकर, सभापती, झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई | विशेष निमंत्रित |
| १७) | श्री.गौतम चटर्जी, | |
| १८) | श्री.वा.ग.गोरडे, सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | |